नव्याने मंत्रिमंडळात समावेश झालेल्या मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांना कार्यालयीन दालनांचे वाटप करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. शाकाजा-१११९/प्र.क्र.७२/२०१९/२२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक: १८ जून, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

राज्य मंत्रीमंडळाचा दिनांक १६.६.२०१९ रोजी विस्तार करण्यात आला असून नव्याने १३ मा.मंत्री/ राज्यमंत्री महोदयांचा मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीमध्ये मा. मंत्री/राज्यमंत्री महोदयांना उपलब्ध करुन देण्यासाठी ९ दालने रिक्त आहेत. या रिक्त दालनांचे वाटप मा. मंत्री/ राज्यमंत्री महोदयांना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याअनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

नव्याने मंत्रिमंडळात समावेश झालेल्या १३ मा. मंत्री/राज्यमंत्री महोदयांपैकी ८ मा. मंत्री व १ मा. राज्यमंत्री महोदयांना सोबत जोडलेल्या विवरणपत्र-अ मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे मंत्रालय व मंत्रालय विस्तार या इमारतीमध्ये कार्यालयीन दालनांचे वाटप करण्यात येत आहे. तसेच, सोबत जोडलेल्या विवरणपत्र-ब मधील उर्वरित ४ राज्यमंत्री महोदयांना मंत्रालय इमारतीमध्ये कार्यालयीन दालने उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात दालन व कार्यालय कार्यान्वित करण्याकरिता विधान भवन, मुंबई येथे जागा उपलब्ध करुन देणेबाबत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांना विनंती करण्यात येत आहे.

३. सदरहू शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१९०६१८१५३३१११८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradnya Prakash Sawant

Digitally signed by Pradnya Prakash Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dcab5c13648ccfdd9424ee4584da4e72f3f6f06dfd6b1eaa220fc9de68f36473, cn=Pradnya Prakash Sawant
Date: 2019.06.18 15:35:06 +05'30'

(प्र. प्र. सावंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य
२. विरोधी पक्षनेते, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ, मुंबई

३. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
६. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. सामान्य प्रशासन विभाग/का.२१(आस्था)/ का.२१(अ)/का.२१ रोख/का.२४, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सार्वजनिक बांधकाम विभाग/प्रशा-४, मंत्रालय, मुंबई-३२.
९. गृह विभाग/विशेष शाखा-४, मंत्रालय, मुंबई-३२.
१०. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११. सुरक्षा अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई-३२.
१३. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर (सा.बां.) विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला, मर्झबान रोड, मुंबई-०१.
१४. उप अभियंता, दक्षिण उप विभाग, सा.बां.वि., मंत्रालय आवार, मुंबई.
१५. उप अभियंता, महानगर टेलिफोन निगम लि, मंत्रालय दुरध्वनी सेवा केंद्र, मंत्रालय-३२.
१६. अग्निशमन दल, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. दूरध्वनी चालिका, महानगर टेलिफोन निगम लि, मंत्रालय मुख्य इमारत, तळमजला, मुंबई-३२.
१८. निवडनस्ती.

विवरणपत्र-अ

मा.मंत्री महोदयांना कार्यालयीन दालन वाटपाचा तक्ता
शासन निर्णय क्र.शाकाजा-१११९/प्र.क्र.७२/२०१९/२२, दि. १८ जून, २०१९ चे सहपत्र.

अ.क्र.	मा. मंत्री	विभाग	वाटप करावयाचे दालन
१	श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे-पाटील	गृहनिर्माण	मंत्रालय विस्तार इमारत, ६ वा मजला, दालन क्र.६०७.
२	श्री. जयदत्त सोनाजीराव क्षीरसागर	रोजगार हमी आणि फलोत्पादन	मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र.२४१.
३	ॲड. आशीष बाबाजी शेलार	शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण	मंत्रालय मुख्य इमारत, १ ला मजला, (उत्तर बाजू), दालन क्र. १०३.
४	डॉ. संजय श्रीराम कुटे	कामगार, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण	मंत्रालय विस्तार इमारत, ५ वा मजला, दालन क्र.५०२.
५	डॉ. सुरेश (भाऊ) दगडू खाडे	सामाजिक न्याय	मंत्रालय विस्तार इमारत, ३ रा मजला, दालन क्र.३१६.
६	डॉ. अनिल सुखदेवराव बोंडे	कृषी	मंत्रालय मुख्य इमारत, ६ वा मजला.
७	डॉ.अशोक रामाजी उइके	आदिवासी विकास	मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र.२०७.
८	डॉ. तानाजीराव जयवंत सावंत	जलसंधारण	मंत्रालय मुख्य इमारत, ५ वा मजला (दक्षिण बाजू).
९	श्री. जयकुमार जितेंद्रसिंह रावल	अन्न व औषध प्रशासन, पर्यटन व राजशिष्टाचार,	मंत्रालय विस्तार इमारत, २ रा मजला, दालन क्र.२०१, २०२, २१२.
अ.क्र.	**मा.राज्यमंत्री**	**विभाग**	
१	डॉ.परिणय रमेश फुके	सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), वने, आदिवासी विकास	मंत्रालय मुख्य इमारत, ३ रा मजला (दक्षिण बाजू), दालन क्र.३०१.

विवरणपत्र-ब

विधान भवन, मुंबई येथे कार्यालयीन दालन वाटप करावयाच्या मा.राज्यमंत्री महोदयांच्या नावाची यादी
शासन निर्णय क्र.शाकाजा-१११९/प्र.क्र.७२/२०१९/२२, दि. १८ जून, २०१९ चे सहपत्र.

अ.क्र.	मा.राज्यमंत्री	विभाग
१	श्री.योगेश अमृतलाल सागर	नगरविकास
२	श्री.अविनाश शरद महातेकर	सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य
३	श्री.संजय (बाळा) विश्वनाथराव भेगडे	कामगार, पर्यावरण, मदत व पुनर्वसन, भूकंप पुनर्वसन
४	श्री.अतुल मोरेश्वर सावे	उद्योग व खनिकर्म, अल्पसंख्याक विकास आणि वक्फ

*****